Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

Impact Factor – 7.139 ISSN – 2319 - 8648

Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

June, 2026
Issue- VI, Vol. I

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Editor
Dr. Vilas Surybhan Tale
Associate Professor,
Department of Political Science,
Coordinator, IQAC, Arts College Buldhana

Shaurya Publication , Latur

Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

Index

1. A Study of Women's Political Participation in Panchayati Raj Institutions: With Special Reference to Latur District — 07
Prof**. Ajinkya Surendra Kadam, Dr. P. K. Nandeshwar**

2. A Comparative Review of the Concept of Liberty in the Political Philosophy of Isaiah Berlin, John Rawls and Robert Nozick — 13
Anshul C. Wankhede, Dr. Vedprakash Dongaonkar

3. Institutional Gender Parity and Policy Transformation: A Critical Inquiry into the Constitution (106th Amendment) Act, 2023 and Democratic Governance in India — 22
Akshay Govind Pawar Prof. Dr. Vilas S. Tale

4. Digital Governance and Last Mile Service Delivery- An Indian Context — 27
Prabodh Janardan Wankhade, Prof. Dr. Vilas Gaikwad

5. Role of Zilla Parishads in District Administration: A Study of Maharashtra — 35
Chaitanya Ashok Bagade, Dr.Vilas Gaikwad

6. Political Socialization and Democratic Citizenship in Indian Schools: A Conceptual Review — 40
Shubham Bhimrao Gawai, Prof. (Dr.) Vilas S. Tale

7. Women's Empowerment Beyond Borders: in Indian Diasporic Literature — 45
S.k. Mateen,[1] S.k. Nazeer[2]

8. अमरावती जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीच्या योजनांचा विकासात्मक अभ्यास — 51
भारत सिताराम डोंगरे, डॉ. विलास गायकवाड

9. लोकसभा निवडणूक २०२४ मधील दिव्यांग मतदारांचा सहभाग : बुलडाणा तालुक्याचा एक विश्लेषणात्मक अभ्यास — 60
प्रशांत आनंदा हिवाळे, प्राचार्य, डॉ. सुरेश रामभाऊ बाठे

10. कृत्रिम बुद्धिमत्तेचा लोकशाहीतील निवडणुकांवरील प्रभाव : एक संशोधनात्मक अभ्यास — 62
डॉ. विलास एस्. टाले

11. संत गाडगेबाबांच्या कीर्तनांतील सामाजिक परिवर्तनाची संकल्पना — 75
गजेंद्र सोनबा टोम्पे, डॉ. विष्णू नामदेव लांडे

12. डॉ. गंगाधर पानतावणे यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व व आंबेडकरवादी विचार — 81
कु. शुभांगी संजय चोथमल, डॉ. विष्णू नामदेव लांडे

13. 'बारोमास' या कादंबरीतील सुशिक्षितांच्या समस्या — 85
श्री विठ्ठल गणपत महाल्ले, डॉ. विष्णू नामदेव लांडे

Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

13 'बारोमास' या कादंबरीतील सुशिक्षितांच्या समस्या

श्री विठ्ठल गणपत महाल्ले,
संशोधक विद्यार्थी,
मराठी विभाग,
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशीम
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

डॉ. विष्णू नामदेव लांडे,
संशोधन मार्गदर्शक,
मराठी विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशीम
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

'बारोमास' ही सदानंद देशमुख यांनी लिहिलेली व साहित्य अकादमी प्राप्त असलेली प्रसिध्द अशी ग्रामीण कादंबरी आहे. या कादंबरीतून लेखकाने शेतकऱ्यांच्या दु:खावर विस्ताराने प्रकाश टाकला. यांत्रिकीकरणामुळे आज शेतकऱ्यांची वाताहत होत आहे, त्याचे विदारक चित्रण या कादंबरीतून आढळते. एकनाथ तनपुरे हा या कादंबरीचा नायक आहे. तो एम.ए.(मराठी) बी.एड् .झालेला आहे. तो सुरूवातीला शिक्षणाच्या बळावर नोकरी मिळविण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करतो, परंतु संस्थेवर डोनेशन देता न आल्याने त्याची नोकरीची संधी हुकते. यातूनच तो वडिलोपार्जित व पारपंरिक असलेल्या शेतीकडे वळतो. शेतीला शिक्षणाची जोड देऊन आधुनिक शेती करण्याचे स्पप्न उराशी बाळगतो. परंतु व्यवस्थेच्या कचाट्यात त्याची वाताहत होते, तो पूर्णपणे होरपळला जातो त्याचे विदारक चित्रण कादंबरीतून आढळते. ही कादंबरी एकट्या एकनाथपुरती मर्यादित न राहता, त्याच्यासारख्या अनेक शेतकऱ्यांच्या दु:खद जीवनाची कहाणी सांगताना दिसून येते. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्याला बारोमास संकटांचा सामना करावा लागतो. त्यातच मोठ्या कष्टाने पिकविलेल्या शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. व्यापारी शेतकऱ्यांचे शोषण करतात. सरकार हे शेतकऱ्यांविषयी उदासिन धोरण ठेवते. शेतकऱ्याला कोणीच वाली नसल्याने, त्याला सदा सर्वदा सावकाराचे उंबरवठे झिजवावे लागतात. सावकार पावलोपावली शेतकऱ्यांचे शोषण करतात. यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्येसारखे पाउले उचलावी लागतात. शेतकऱ्यांचे दु:खद जीवन हा या कादंबरीचा मुख्य विषय असला तरीही, या कादंबरीतून लेखकाने आजच्या पीढीतील अनेक सुशिक्षीत तरूणांच्या समस्यांही रेखाटल्या आहेत.त्याचा परामर्श पुढीलप्रमाणे घेता येईल.

या कादंबरीचा नायक एकनाथ तनपुरे हा आहे. तो. एम.ए. बी.एड्. झालेला उच्चशिक्षीत असा तरूण आहे. एकनाथचे वडील सुभानराव दादा व आई शेवंताबाई हे एकनाथला शिकविण्यासाठी जीवाचे रान करतात. पोटाला चिमटा देऊन दिवस काढतात. आपल्या दोन्हीही मुलांना शिकवितात. एकनाथ शिक्षण घेत असताना अनेक स्वप्न पाहतो. आपण एखाद्या कॉलेजवर प्राध्यापक होऊ. आई-वडील, पत्नी यांचे स्वप्न पूर्ण करू. चांगले घर बांधू, गाडी घेऊ. शेती सुधारू. यासारखे कितीतरी स्वप्न तो पाहतो. परंतु शिक्षण घेतल्यानंतर तो जेव्हा नोकरीचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्याला अनेक संकटांचा सामना करावा लागतो. गुणवत्ता असूनही नोकरी मिळत नाही. शिक्षण संस्थामध्ये नोकरी मिळविण्यासाठी डोनेशनच्या नावाखाली पैशाची मागणी केली जाते. एकनाथच्या घरी 20 एक्कर जमीन असूनही, शेतीमध्ये फारसे उत्पन्न होत नसल्याने त्याला एक लाख रू. भरता येत नाहीत. शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही. नोकरीच्या पैशाची जुळवाजुळव

Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

करायची तर शेत विकल्याशिवाय पर्याय नसतो. अशावेळी दगडू महाकाळसारखे सावकार कल्याणीच्या मळयाची मागणी करतात. परंतु एकनाथचे वडील (सुभानराव दादा) मात्र त्यास विरोध करतात. डोनेशनसाठी लागणारे पैसे न भरल्याने, एकनाथला नोकरी मिळत नाही. पर्यायाने त्याला शेती करण्याची वेळ येते.

एकनाथ हा चांगला शिकलेला तरूण आहे. तो प्राध्यापक होऊ शकतो. असे वाटल्याने त्याचे सासरे (अलकाचे वडील) हे त्याच्यासोबत अलकाचे लग्न लाऊन देतात. अलका जीवनात आल्यानेही एकनाथला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अलका ही शिकलेली तरूणी त्याला मिळते. ती अनेक स्वप्न घेऊन एकनाथसोबत संसार करू लागते. परंतु शेतीच्या भरोशावर एकनाथ तिचे स्वप्न पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे अलका व एकनाथ यांच्या पावलोपावली खटके उडताना दिसून येतात. एकनाथने आपल्या भावाची मुलगी मुक्ता हिच्यासोबत, लग्न करावे, असे त्याच्या आईला वाटते. परंतु एकनाथला मात्र आपण शिकलेला असल्याने खेडवळ मुलगी पत्नी म्हणून नकोशी वाटते. अशिक्षित असलेल्या मुक्तासोबत आपली वैचारिक पातळी जुळणार नसल्याने, तो तिला नाकारतो. पुढे अलका ही शिकलेली तरूणी त्याच्या जीवनात पत्नी म्हणून येते. ती मोहाडीसारख्या शहरासारख्या गावी व सुखवस्तु घरांत वाढलेली असल्याने तिला एकनाथचे जुने माळवदाचे घर नकोसे वाटते. तिला या घरामध्ये गॅस मिळत नाही. चुलीवर स्वंयपाक करावा लागतो. स्वंयपाकासाठी इंधन मिळत नाही. घरातून सतत उठता-बसता माती पडते. घरी साधी साखर-पतीचीही सोय होत नाही. यामुळे तिचे या घरात मन रमत नाही. त्यातल्या त्यात एकनाथने आपल्या भावाची मुलगी मुक्ता न केल्याने, शेवंताबाई तिचा जाणीवपूर्वक जाच करते. तिला घरकाम, स्वयंपाक व अन्य कोणत्याही कामात मदत करत नाही. याउलट घरची सर्व कामे तिच्यावर सोडून देते. यामुळे अलका वैतागते. घरात सतत सासू-सुनेत भांडणे होतात. यामुळे एकनाथला आई व बायको यापैकी कोणाचीही बाजू घेता येत नाही. बायको घरकाम करीत असताना तिला आपण मदत करावी असे त्याला वाटते. परंतु शेवंतामाय नको नको ते बोलत असल्याने त्याला काहीही करता येत नाही. शेवंतामायची बाजू घेतली तर बायको नको नको ते बोलते. त्यामुळे त्याचे घरी-दारी कुठेच मन रमत नाही. शेतात गेला असता, तिथे पाऊस नसल्याने कोवळी पीके करपून जातात, हे दृश्यही त्याला पाहवल्या जात नाही. अस्वस्थ, कासावीस, बेचैन असे एकनाथचे जीवन चित्रण या कादंबरीतून आढळते. त्याच्या मनाचा सतत कोंडमारा होतो. त्याला पावलोपावलो मन मारून जीवन जगावे लागते. घरातील अशा परिस्थितीमुळे आपण अलकासोबत विनाकारण लग्न केले. आपण अलकाला फसविले, तिला छळले असा पश्चाताप होतो. त्यामुळेच आपण मुक्तासोबत लग्न केले असते, तर कदाचित आपण सुखी राहिलो असतो असे विचार त्याच्या मनात येऊ लागतात. आपणच मुक्ताला नकार दिल्याने त्याचेही दु:ख त्याला वाटू लागते. त्यामुळेच आपण अलका व मुक्ता या दोघींनाही दु:खी केल्याची खंत त्याला वाटू लागते..

एकनाथ हा सुशिक्षित असल्याने त्याला ग्रामीण भागात वावरताना नेमकी कोणती भाषा वापरावी हा सतत प्रश्न पडतो. समाजात वावरताना त्याला धड ग्रामीण भाषेत बोलता येत नाही व धड प्रमाण भाषेतही बोलता येत नाही. शुध्द भाषेत बोलण्याचा प्रयत्न केला तर आजूबाजूचे लोकं नाव-बोटं ठेवतात. तर दुसरीकडे

Issue VI , Vol. I (Indexed) June, 2026	Peer Reviewed SJIF Impact factor	ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

ग्रामीण भाषेत बोलण्याचा प्रयत्न केला असता बायको नाव ठेवते. कपडे घालतानाही इस्त्रीचे कपडे घालता येत नाही. यामुळे त्याची पावलोपावली कोंडी व घुसमट होताना दिसते.

एकनाथसारख्या शिकलेल्या अनेक तरूणांना नोकरी मिळत नाही. शिक्षण झाल्यानंतर त्यांना खाजगी संस्थेवर नोकरीसाठी प्रयत्न करावे लागतात. तिथे संस्था चालक गुणवत्तेपेक्षा पैशालाच अधिक महत्व देतात. दिवसेंदिवस शिक्षण संस्थेतील डोनेशनमध्ये वाढ होते. शिक्षण संस्थाच्या भरतीचे नियम दरवर्षी बदलतात. अनेक नेमणूका कंत्राटी पध्दतीवर होतात. डोनेशन देऊनही अडीच-तीन हजार रू. महिण्यावर काम करावे लागते. अनेकांना वर्षोनवर्षे फुकटात काम करावे लागते. अनुदान आल्यानंतर अनेकांना शिक्षणसंस्थातून काढून टाकले जाते. अनेकांनी कमी वेतनात काम करूनही, संस्थाचालक त्यांच्यावर सतत टांगती तलवार ठेवतात.

एकनाथसारख्या सुशिक्षित बेरोजगार असलेल्या तरूणांचे मन वाचनातही रमत नाही. मन अस्वस्थ झाले असता त्याला लीळाचरित्र, दृष्टांतपाठ, ज्ञानेश्वरी, केशवसुत, बालकवी इ. सारखे साहित्य व साहित्यिकांचे साहित्य वाचावेसे वाटते, परंतु एम.ए. ला अभ्यासलेलीच पुस्तके कितीदा वाचावीत, साहित्यातून मिळविलेले ज्ञान कोणासमोर शिकवावे यासारखे कितीतरी प्रश्न त्याला पडतात. वाचनात मन न रमल्याने, विद्यार्थी दशेतील कविता वाचण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्या कविता वाचूनही त्याला पश्चाताप होतो. या कविता खऱ्या वाटत नाही, त्या बाष्कळ व तकलादू वाटू लागतात.

आपल्या शिक्षणामुळे आपला काहीच विकास झाल्याचे एकनाथला वाटत नाही. यामुळे आपण शिकलो कशाला हा प्रश्न त्याला पडतो. नोकरीसाठी त्याला जागोजागी डोनेशनची मागणी केली जाते. अनेकदा नोकरीसाठी त्याची जातही आडवी येते. त्यामुळे याच्यापेक्षा आपण मागास वर्गात जन्मास आलो असतो तर किती बरं होतं. असे वाटायला लागते. नोकरीसाठी SC, ST, VJ, NT यासारखी कोणतीही जात स्वीकारण्याची तयारी दर्शवितो. एकीकडे त्याला जात बदलावी असे वाटत असताना, दुसरीकडे मात्र दिनकर दाभाडे सारखे मागास जातीतील मुले ही बेकार अवस्थेत फिरताना दिसतात.

एकनाथच्या आईने अलकाला सोन्याच्या बांगड्या मागितल्याने, अलका रागाच्या भरात माहेरी निघून जाते. त्यावेळी ती एकनाथकडे 50 रू. ची. मागणी करते. परंतु एकनाथ तिला 50 रू. सुध्दा देऊ शकत नाही. त्यामुळे त्याची पत्नी त्याला तुच्छ लेखते. ती त्याला पावलोपाली नेभळट, हलकट, बेशरम,निष्क्रिय असे म्हणत हिणवताना दिसते.

या कादंबरीतील मधू (एकनाथचा भाऊ) हा 12 वी सायन्स मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होतो. पुढेचालून तो शेतकी शाळेचे शिक्षण घेतो. अनेक स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होतो. त्याला मुलाखतीलाही बोलावले जाते. इथे तलाठ्याची नोकरी मिळविण्यासाठी निवड समितीचा अध्यक्ष डखाळे हा पन्नास हजार रूपयाची मागणी करतो. त्याला पैसे न भरता आल्याने, त्याची नोकरीची संधी हुकते. आपणास तलाठ्याची नोकरी लागणार असल्याचे तो सर्वत्र चर्चा करतो. यातूनच अलका वहिणीच्या मावस बहीणीची त्याच्यासाठी सोयरिक येते. परंतु अलका वहिणीच त्यांना त्यांची सोनल नावाची मुलगी मधूला देण्यास नकार दर्शविते. यातूनच मधू

Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

हा अधिकच चीडतो. नोकरी मिळत नसल्याने, तो गावातील गुप्त धनाचा शोध घेण्यासाठी सोनेरी टोळी बनवितो. सोनेरी टोळीच्या मदतीने गावात गुप्त धन मिळण्याच्या शक्यतेने रात्री बे रात्री खोदकाम करण्याचे काम करतो. सोने मिळविण्यासाठी तो अनेक दिवस प्रयत्न करतो. या कामी अपयश येत असल्याने, तो साठे तलाठ्याच्या मदतीने नोकरीसाठी प्रयत्न करतो. त्यासाठी सोनखाशीचा सुपिक मळा हा दगडू महाकाळच्या नावे करून पैशाची उचल करतो. पैसे भरूनही त्याला नोकरी मिळत नाही. उल्ट नोकरी मिळविण्याच्या नादात सोनकाशीचा मळा हा दगडू महाकाळच्या कायमचा घशात जातो. त्यामुळे त्याच्या एकूणच कुटूंबाची वाताहत होताना दिसून येते.

या कादंबरीतील दिलीप पवार हा बी.एड.पर्यंतचे शिक्षण घेतो. बी.एड.नंतर तो शेवलीच्या विनाअनुदान शाळेवर बिनपगारी शिक्षक म्हणून तीन वर्ष काम करतो. शाळेला अनुदान आल्यानंतर त्या शाळेचे संस्थाचालक त्याच्याकडे एक लाख रू. डोनेशनची मागणी करतात. त्याची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने हे पैसे त्याला भरता येत नाही. वडिलोपार्जित शेती नसल्याने, पैसे जुळविण्याचा प्रयत्न करता येत नाही. त्चे आई-वडील रोज मजूरी करून कसे भसे पोट भरत. अशावेळी एक लाख रू. कुठून आणावे हा प्रश्न त्याला भोडसावतो. यातूनच मधूच्या सोनेरी टोळीत सहभागी होतो. मध व सोनेरी टोळीच्या मदतीने गावातील गुप्तधनाचा शोध घेतो. त्यामुळे धन शोधताना एखादा हंडाच आपल्याला सापडावा असे त्याला वाटते. 01 जुलै च्या आत पैसे न भरल्यास, संस्थाचालक त्याच्याजागी दुसऱ्याची नियुक्ती करतील ही भीती त्याला वाटते. त्यामुळेच तो धनाच्या उत्सुकतोपोटी बनुबा नावाच्या मांत्रिकाला अनेक प्रश्न विचारताना दिसतो. गुप्तधनाचा शोध घेण्याच्या प्रयत्नात, खोदकाम करताना मृत माणसांचा सांगाडा लागतो. अशावेळी भीती निर्माण झाल्याने तो दगडावर पडतो. यातच त्याला ब्रेन हॅमर होतो. पुढे तो वेडा झाल्याने रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांच्या मागे दगड भिरकावताना दिसून येतो.

या कादंबरीतील नरूभाऊ हा एम.एस्सी. कृषी चे शिक्षण घेतो. त्यालाही नोकरी मिळत नाही. नोकरी मिळत नसल्याने, तो शेतीला शिक्षणाची जोड देऊन आधुनिक शेती करण्याचे स्वप्न उराशी बाळगतो. आधुनिक शेतीसाठी नवे विषय, नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे असे त्याला वाटते. राजकारणापासून दूर राहून शेतकऱ्यांना जोडण्याचे काम करतो. शेतीचा व्यवसाय त्याला एखादया लढाईसारखा वाटू लागतो..

या कादंबरीतील दिनकर दाभाडे हा एम.ए. राज्यशास्त्र झालेला आहे. तो वयाच्या 50 व्या वर्षापर्यंत नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्न करतो. नोकरी मिळत नसल्याने शेतीला पूरक असे गोट फॉर्म, पोल्टी फार्म, दुग्ध व्यवसाय इ. जोड व्यवसाय करण्याच्या योजना आखतो. परंतु पैशाच्या अडचणीमुळे त्याला यामध्ये यश मिळत नाही. सेट परीक्षा उत्तीर्ण झालेला असताही, त्याला साधा आनंदसुध्दा घेता येत नाही. वैरागडच्या कॉलेजवर एस.सी. ची जागा राखीव असतानाही इथे महार, मांग जातीच्या उमेदवाराला प्राधान्य दिले जात नाही. डोनेशनसाठी पैसे न भरता आल्याने त्याला अखेरीस बँड पार्टीतच काम करावे लागते.

याउलट या कादंबरीतील शेवलकर या पात्राची स्थिती आहे. तो नुसता एम.ए. उत्तीर्ण असतानाही प्राध्यापक म्हणून नोकरीला लागतो. सेट, सेट, पीएच.डी. नसतानाही नोकरीमध्ये कायम होतो. त्यामुळेच

Issue VI , Vol. I (Indexed) June, 2026	Peer Reviewed SJIF Impact factor	ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

नोकरीसाठी घेतल्या जाणाऱ्या मुलाखती या लेखकाला नुसते नाटक वाटायला लागतात. शिक्षणव्यवस्थेत एकीकडे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना डावलले जाते, तर दुसरीकडे गुणवत्ता नसलेल्या व्यक्तींला मान-सन्मान दिले जातात. डी.एड., बी.एड्, आयटीआय, अँग्री, पदवीधर, बारावी झालेल्या अनेक बेरोजगाराच्या शोचनिय अशा कहाण्या लेखकाने अधोरेखित केल्या आहेत. नोकरीच्या नावाखाली अनेक बेरोजगारांना फसविले जाते. संस्थाचालक एक जागेसाठी अनेक जणांकडून पैसे मिळवितात. बोगस संस्था स्थापन करून नोकरीच्या बहाण्याने अनेकांच्या जमिनीही बळकावत असल्याचे धक्कादायक चित्रण कादंबरीतून आढळते.

एकूणच 'बारोमास' या कादंबरीतून अनेक सुशिक्षित बेरोजगारांच्या शोचनिय व विदारक अशा कथा आढळून येतात. शिक्षणासाठी तरूणांना मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. प्रसंगी शिक्षणासाठी पीढीजात जमिनी विकाव्या लागतात. गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊनही आजच्या व्यवस्थेत मात्र गुणवत्तेची कदर केली जात नाही. गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांला डावलून, गुणवत्ता नसलेल्या व्यक्तींला संधी दिली जाते. ज्याच्याकडे आहे त्याला भरपूर मिळते, परंतु नाही त्याला काहीच मिळत नाही. त्यामुळेच सुशिक्षीत बेरोजगारांच्या या कहाण्यातून त्यांची होणारी घुसमट लेखकाने जिवंतपणे उभी केली आहे. अशापरिस्थितीमुळेच देशात आर्थिक विषमता वाढत आहे. अशीच परिस्थिती जर कायम राहिली तर येणाऱ्या काळात या व्यवस्थेत आनागोंदी व अराजक निर्माण झाल्याशिवाय राहणार नसल्याचे लेखकाने सूचित केले आहे.

संदर्भ ग्रंथ

1) बारोमास, सदानंद देशमुख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती 2013